# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk4a@dte.org.in Internet :htpp/www.dte.org.in


अतितात्काळ

क्रमांक : ४अ/आस्था/२०१०/१०७२०
दिनांक : ०१.०४.२०१०

प्रति,

१. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई ५१.

२. सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

३. सर्व प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम पदविका संस्था.

४. सर्व उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळे

विषय : प्रलंबित मागण्यांची पुर्तता न झाल्यामुळे संघटनेच्या आंदोलनाबाबत

महाराष्ट्र गव्हर्न्मेंट पॉलिटेक्निक टिचर्स (गॅझेटेड वर्ग १) वेलफेअर असोसिएशन या संघटनेने त्यांच्या प्रमुख मागण्या मान्य करण्याकरीता संचालनायास दि २८.०३.२०१० अन्वये निवेदन दिलेले आहे. सदर निवेदनामध्ये मागण्यांची पुर्तता होत नसल्यामुळे नाईलाजाने दिनांक ०३.०४.२०१० रोजी काळी फित लाऊन शासनाच्या दिरंगाईबद्दल निषेध व्यक्त करतील व तरी मागण्यांची पुर्तता न झाल्यास दि ०६.०४.२०१० पासून महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सर्व प्रकारच्या कामांवर बहिष्कार टाकतील तसेच स्वायत्त संस्थेतील परिक्षांच्या कामावर बहिष्कार टाकतील असे कळविले आहे.

या प्रकरणी सर्व कार्यालय / संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयातील / संस्थेतील सर्व अध्यापकांची सभा घेऊन त्यांच्या दि २८.०३.२०१० च्या निवेदनावर मंत्रालयीनस्तरावर / संचालनालयस्तरावर विचारविनीमय सुरु असून लवकरात लवकर प्रलंबित प्रकरणांवर कार्यवाही करण्यात येत असल्याचे सर्वांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच सर्व

अध्यापकांना दिनांक ०६.०४.२०१० पासून आपले दैनंदिन काम सुरळीतपणे सुरु ठेवून कार्यालय तथा संस्थेस सहकार्य करावे जेणेकरुन संस्थेतील शैक्षणिक व प्रशासकीय काम सुरळीतपणे सुरु राहील याबाबत सुचना देण्यात याव्या. त्याचप्रमाणे स्वायत्त संस्थांतील परिक्षा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करावे म्हणजे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितावर कोणताही अनिष्ट परिणाम होणार नाही. तसेच या संपामध्ये शासनाच्या / संचालनालयाच्या / मरातंशि मंडळाच्या नैमित्तीक कामामध्ये अडथळा निर्माण करणा-या अध्यापकांवर योग्य ती कार्यवाही शासनामार्फत केली जाईल याची पूर्ण जाणीव संबंधितांना देण्यात यावी.

( डॉ सु का महाजन )
प्र संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.